**संभाजी पुलापासून महर्षी विठ्ठल रामजी शिंदे पुलापर्यंत मुठा नदीच्या डाव्या काठावर मेट्रो पिअर्सचे बांधकाम:**

**मुठा नदीच्या डाव्या काठावर मेट्रो पिअर्सचे बांधकाम विभागीय आयुक्त, पुणे यांच्या अध्यक्षतेखाली एनजीटीने नेमलेल्या तज्ज्ञ समितीच्या देखरेखीखाली सुरू आहे. ही बाब एनजीटीकडे दाखल आहे. नुकत्याच आलेल्या बातम्यांच्या आधारे सीडब्ल्यूपीआरएस अहवालाचा हवाला देऊन मेट्रो पाइअर्सच्या बांधकामामुळे मुठा नदीच्या पुराच्या संदर्भात आलेल्या बातम्यांच्या बाबत महा-मेट्रोने स्पष्टीकरण देण्याबाबत विचार केला आहे.**

**विभागीय आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली आगामी बैठकीत सीडब्ल्यूआरपीएस अहवाल तज्ञ समितीसमोर मांडला जाईल व त्यावर चर्चा केली जाईल. तथापि, महा-मेट्रोचे मत आहे की नोंदवलेली मूल्ये सत्यापासून दूर आहेत. सीडब्ल्यूपीआरएस अहवालात महा-मेट्रोने एनजीटीला सादर केलेल्या अहवालाची तुलना केली आहे.**

**मुठा नदीच्या डाव्या काठावर मेट्रो व्हायडक्टच्या पायर्सच्या बांधकामामुळे नदीचा प्रवाह आणि नदीच्या फुगवाट्याचा प्रश्न 19 जानेवारी 2021 रोजी पुण्याच्या अनेक वृत्तपत्रांमध्ये ठळकपणे समोर आला आहे. हे स्पष्टपणे सीडब्ल्यूपीआरएस अहवालाचा चुकीचा अर्थ लावला आहे. नदीपात्रात या भागांत मेट्रोचे 46 पियर आहेत. सीडब्ल्यूपीआरएसने पूर पातळीत होणाऱ्या वाढीचा अंदाज 60000 क्युसेक्स आणि 100,000 क्युसेक्ससाठी निर्देशित केला आहे. या पूरात अनुक्रमे ब्लू लाइन आणि रेड लाइनचा संदर्भ आहे. 60000 क्युसेक्स आणि 100,000 क्युसेक्सच्या पूरात मोजल्या जाणाऱ्या एफ्लक्सची नोंद अनुक्रमे 241 मिमी (म्हणजेच 10 इंच) आणि 219 मिमी (म्हणजे 9 इंच) आहे. ही खूप गौण वाढ आहे. या व्यतिरिक्त ही वाढ एकाच ठिकाणी आहे. जे 2019 च्या पूर दरम्यान घेण्यात आलेल्या खालील छायाचित्रांमधून लक्षात येऊ शकते.**

**वृत्तपत्रांमध्ये नमूद केलेली 116 मी. 140 मी. नदीफुगवट्याची संख्या CWPRS रिपोर्टमध्ये नमूद केलेल्या संख्येपेक्षा अतिशयोक्ती असून खूप जास्त आहे.**

**साधारणतः 100,000क्युसेक्स पाण्यामुळे नदीच्या दोन्ही बाजूंना सरासरी 1.25 ते 5.25 मी म्हणजेच एकूण 2.25 मी ते 11 मी इतका असू शकेल. एकूण 46 ठिकाणांपैकी 3 ते 4 ठिकाणी फुगवटा 1.25 ते 5.25 मी पेक्ष्या जास्त असू शकेल कारण सिताफली बागच्या विशिष्ट रचनेमुळे. आशा प्रकारे नोंदवलेली मूल्ये सत्यपासून दूर आहेत. CWPRS अहवाल महा मेट्रोने NGT ला सादर केलेल्या अहवालाचीच पुष्टी करतो.**

**सीडब्ल्यूपीआरएस अहवालात महा मेट्रोने एनजीटीला सादर केलेल्या अहवालाची तुलना केली आहे.**

**हा अहवाल विभागीय आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली आगामी बैठकीत तज्ञ समितीसमवेत मांडला जाईल व त्यावर चर्चा केली जाईल.**